MHNG030012172024

<u>नियमित फौजदारी खटला क्र.२२७/२०२४ मधील नि.क्र.२३ वरील अंतिम आदेश</u>

१.  अर्जदार नामे मंदार अनिरूध्द कोलते यांनी प्रस्तूत अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ प्रमाणे आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर/धंतोली पोलीस स्टेशन, नागपूर यांनी गुन्हा क्र.४४०/२०२३ मध्ये जप्त केलेला अर्जदार यांचे मालकीचा मुद्देमाल म्हणजेच एक सोन्याचे ब्रेसलेट वजन अंदाजे ४६.६८० ग्रॅम, एक सोन्याची रिंग वजन अंदाजे ०५.३०० ग्रॅम, एक सोन्याची रिंग वजन अंदाजे ०७.०२० ग्रॅम, एक सोन्याची रिंग वजन अंदाजे ०७.३३० ग्रॅम, एक सोन्याची रिंग वजन अंदाजे ०३.७१० ग्रॅम व एक सोन्याची रिंग वजन अंदाजे ०५.२२० ग्रॅम सुपूर्तनाम्यावर परत मिळणेसाठी दाखल केला आहे.

२.  प्रस्तूत अर्जाच्या अनुषंगाने सहाय्यक सरकारी वकील व आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर यांचे म्हणणे मागविण्यात आले. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. मी त्याचे अवलोकन केले. दिनांक ०३.०५.२०२४ रोजी तपासी अधिकारी नामे एस.एस. मुढे यांनी त्यांचे लेखी म्हणण्यामध्ये असे नमूद केले होते की, सदर गुन्हयात कोणत्याही मौल्यवान वस्तू, सोने–चांदी जप्त करण्यात आलेल्या नाहीत. तसेच दिनांक ०४.११.२०२४ रोजी तपासी अधिकारी नामे सागर आव्हाड यांनी त्यांचे पुरवणी म्हणण्यामध्ये आरोपीस अटक करतेवेळेस त्याचे अंगावर मिळून आलेल्या पिवळया धातूच्या एकूण पाच अंगठया व पिवळया धातूचे एक ब्रेसलेट असे एकूण सहा नग वस्तू जप्त आहेत.

३.  अर्जदार याने प्रस्तूत अर्जाच्या पुष्ठर्थ जप्त मुद्देमालाबाबत बिल इत्यादींच्या पडताळणी केलेल्या प्रती दाखल केल्या आहेत. तपासी अधिकारी यांनी दाखल केलेल्या लेखी म्हणण्यानुसार सदर मुद्देमाल नमूद गुन्हयामध्ये जप्त करण्यात आलेला आहे.

४.  मा.सर्वोच्च न्यायालयाने **सुंदरभाई अंबालाल देसाई –वि– स्टेट ऑफ गुजराथ, (Special Leave Petition(Cri) 2745 of 2002)** या न्यायनिवाडयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ प्रमाणे तसेच जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाच्या अनुषंगाने निर्देश दिलेले आहेत.

५.	तपासी अधिकारी यांनी त्यांच्या म्हाणण्यामध्ये असे नमूद केले आहे की, अर्जदाराने दिनांक २७.०७.२०२३ रोजी खबरी कडून एक कोटी रूपये घेवून त्याच दिवशी सायंकाळी सोने खरेदी केले. परंतु, दोषारोपपत्र व एफआयआरचे अवलोकन केले असता अर्जदाराने खबरीकडून एक कोटी रूपये घेतल्याचा कुठलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही म्हणून तपासी अधिकारी यांच्या म्हणणे विश्वसनीय नाही. त्यामुळे अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज व त्याअनुषंगाने दाखल केलेले कागदपत्र तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाचे वर नमूद न्यायनिवाडयातील निर्देशानुसार, अर्जदार याचा अर्ज खालील अटी व शर्तीप्रमाणे मंजूर करण्यात येतो. करीता खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

१.	अर्ज मंजूर करण्यात येतो.

२.	निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर/धंतोली पोलीस स्टेशन, नागपूर यांना आदेशीत करण्यात येते की, अपराध क्र.४४०/२०२३ मधील जप्त एक सोन्याचे ब्रेसलेट वजन अंदाजे ४६.६८० ग्रॅम, एक सोन्याची रिंग वजन अंदाजे ०५.३०० ग्रॅम, एक सोन्याची रिंग वजन अंदाजे ०७.०२० ग्रॅम, एक सोन्याची रिंग वजन अंदाजे ०७.३३० ग्रॅम, एक सोन्याची रिंग वजन अंदाजे ०३.७१० ग्रॅम व एक सोन्याची रिंग वजन अंदाजे ०५.२२० अर्जदार यांना रक्कम रु.५,५०,०००/- इतक्या स्वरुपाच्या सुपूर्तनामा मुद्रांका आधारे देण्यात यावा.

३.	अर्जदार यांनी सदर मुद्देमालामध्ये कोणत्याही प्रकारचे फेरबदल, हस्तांतर अथवा त्याच्या मुळ स्वरुपात प्रकरणाचा निकाल लागेपवेतो बदल करु नये किंवा कोणत्याही अन्य मार्गाने विल्हेवाट लावू नये.

४.	निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर/धंतोली पोलीस स्टेशन, नागपूर यांनी जप्त मुद्देमाल व त्याच्या वर्णनाचा तपशिलवार पंचनामा करुन जप्त मुद्देमालाचे छायाचित्र जतन करावे व सदर मुद्देमाल परतीच्या अनुषंगानेची सर्व कागदपत्रे व अभिलेखाचे रितसर जतन करावे.

५.	अर्जदार यांनी सदर जप्त मुद्देमाल व त्याची कागदपत्रे तपासी अधिकारी यांना तपासादरम्यान आवश्यकता भासल्यास संबंधित कार्यालय येथे हजर करावे.

RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Digitally signed by RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Date: 2024.12.04 10:55:33 +0530

**(राहूल के. गायकवाड)**

दि.०३.१२.२०२४

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१, नागपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : P. M. Chaware